# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 11/11/2022 (शुक्रवार) सकाळ

## घरफोडी

**पोस्टे. कन्हान** :— अंतर्गत ०५ कि.मी. अंतरावरील टेकाडी बस स्टॉप, राम मंदीर जवळ दिनांक ०८/११/२०२२ चे १८.४० वा. ते १९.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे—भुजंग शत्रुधन ठाकरे, वय ३२ वर्ष, रा. टेकाडी हे निलज गावाचे उपसंरपच या पदावर कार्यरत असुन दिनांक ०९/११/२०२२ रोजी जलस्वरक्षक नामे— मनोज टोहने, वय ३४ वर्ष यांनी रात्री २०.०० वा. ग्रामपंचायतीचे पाण्याच्या टाकी जवळील पंपहाउस मधील पंप बंद करून व कुलुप लाऊन घरी गेले असता नमुद घटनावेळी ०४.३० वा. पंप हाऊस मधील मोटार चालु करायला गेले असता दरवाज्याचे कुलुप बंद होते. दरवाज्याचे खालील टिन वाकवुन जाण्यास जागा केलेली दिसली. आत जाऊन पाहिले असता दोन समलसीवल मोटार जुन्या प्रत्येकी किमंती अंदाजे २०,०००/—रू. प्रमाणे व ०४ बॅग ब्लीचींग पाउडर बॅग प्रत्येकी किमती १२९०/—रू. किमती ५१६०/—रू., ए ३ फेस केबल १०० मिटर किंमती १५७००/— रू. या सर्व सामानावरून असा एकुण किमती अंदाजे ६०,८६०/— यातील आरोपी नामे— १) अंकीत त्रिपाठी, २) समीर सिद्धीकी, ३) अनोळखी एक इसम यांनी चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपींचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन कन्हान करीत आहे.

## रेती चोरी करणाऱ्या आरोपींवर कारवाई

पो.स्टे. कन्हान :— अंतर्गत ०६ कि.मी. अंतरावर मौजा टेकाडी फाटा, कन्हान येथे दिनांक १०/११/२०२२ चे ०८.३० वा. ते ०९.०० वा. दरम्यान पोलीस स्टेशन कन्हान येथील स्टाफ हे पोलीस स्टेशन कन्हान हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना त्यांना जुन्या लाल रंगाचा विना नंबरचा टॅक्टर क्र MH 31AG 6189 व ट्रॉली क्र. MH-3123956 मध्ये अवैधरित्या रेती चोरी करतांनी मिळुन आले. आरोपी ट्रॅक्टर मुन्डा क्र MH-31 AG-6189 व ट्रॉली क्र MH-31 Z-3956 चा चालक व मालक यांनी जुन्या लाल रंगाचा विना नंबरचा टॅक्टर क्र MH 31AG 6189 किंमती 4,00,000/- व ट्रॉली क्र. MH-3123956 किंमती 3,00,000/- असून ट्रॉली मध्ये एक ब्रॉस रेती किमती 5000/— असा एकुण 7,05,000/— रूपयाचा मुद्देमाल चोरी करतांना मिळुन आल्याने आरोपींच्या ताब्यातुन जप्त करण्यात आला आहे. सदर आरोपी हे ट्रॅक्टरचा मुडा MH-31 AG-6189 व टॉली MH-3173956 चा चालक हा घटनास्थळाहुन पळून गेले.

सदर प्रकरणी कन्हान पोलीसांनी, पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरूद्ध कलम ३७९, १०९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला असुन ट्रॅक्टर व ट्रॉली चालक आरोपींचा शोध घेणे सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन कन्हान करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**

---